# पत्ता मेमो

Exh. 6/C

फौजदारी किरकोळ अर्ज नं. १३९/२०२५

मे. जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे कोर्टात

श्री. अरूण राजाराम मोरे ) अर्जदार

विरूद्ध

Seen & filed
P.D.J, Kop
1-4-26

सुप्रिया अरूण मोरे ) वि.प.

यातील वि.प. यांचा कायमचा ॲड्रेस मेमो

| अ.नं. | पक्षकारांचे नांव | संपूर्ण पत्ता |
|---|---|---|
| १ | सुप्रिया अरूण मोरे | रा. द्वारा भगवान आदाप्पा नाईक रामलक्ष्मणनगर, संभाजीपूर ता. शिरोळ, जि. कोल्हापूर |

येणेप्रमाणे असे, तारीख : ०१/०४/२०२६

प्रतिज्ञा

आम्ही यातील वि.प. अशी प्रतिज्ञा करतो की, आम्ही वर पत्ता मेमो मध्ये दिलेला पत्ता हा खरा व बरोबर आहे. आम्ही वर लिहीलेल्या पत्त्यात बदल झालेस आमचा पत्ता मेमो पुन्हा नवीन देत आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

सही तारीख ०१/०४/२०२६

Exh. 7/C

कि. फौजदारी अर्ज नं. १३९/२०२५

मे. जिल्हा व सत्र न्यायाधिशसो कोल्हापूर यांचे कोर्टात

अरूण राजाराम मोरे ) अर्जदार

विरूद्ध

सुप्रिया अरूण मोरे ) वि.प.

यातील वि.प. तर्फे म्हणणे असे की,

Seen & filed
VBK
P.D.J. Kop
1-4-26

१) यातील अर्जदारांचा अर्ज धादांत खोटा व लबाडीचा असून तो मान्य व कबूल नाही.

२). यातील अर्जदार यांनी ज्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज एका कोर्टातून दुस-या कोर्टाकडे वर्ग करणेबाबत दिलेला आहे त्याची कारणे पूर्णतः चुकीची आहेत.

३) अर्जदाराचे वकील व जयसिंगपूर येथील पिठासीन अधिकारी मे. व्ही. एम. कोळेकरसो हे सांगली येथील न्यायालयात सांगली जिल्हा बार असोसिएशनचे एकत्र सदस्य होते ही बाब अचानकपणे ऑक्टोंबर २०२५ मध्ये कधी ध्यानात आली याचे कारण अर्जात दिलेले नाही. ज्या महिन्यात सदरचे प्रकरण मे. कोळेकरसो यांचे कोर्टात वर्ग झाले तेव्हा तत्काळ पहिल्याच तारखेला त्याच मे. कोर्टात अर्ज देणे व प्रकरण वर्ग करून घेणे गरजेचे होते, परंतू जाणीवपुर्वक काम लांबविण्याचा हेतूने सदरचा अर्ज दिलेला आहे हे स्पष्ट होते.

४) पिठासीन अधिकारी मे. कोळेकरसो यांचेसमोर मागील ब-याच तारखांना काम चाललेले आहे. वि. प. यांचा युक्तीवाद एक वर्षापुर्वी केलेला आहे. असे असताना मागील एक वर्षापासून अर्जदार मे. कोळेकरसो यांचे कोर्टातील सदरचे प्रकरण वेगवेगळया कारणावरून प्रलंबित ठेवलेले आहे. केवळ काम लांबविणेसाठी वेगवेगळया तारखा आजअखेर घेत आलेले आहेत त्यामुळे सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

५) आता मे.कोळेकरसो पिठासीन अधिकारी यांची औरंगाबाद येथे बदली झाली आहे, केवळ एकच महिना शेवटचा ठरलेला आहे. तसेच इतर पिठासीन अधिकारी यांची बदली झाली आहे याचा विचार करता या क्षणाला ज्या कारणावरून प्रकरण वर्ग करून मागितले आहे ते संपुष्टात आले आहे.

६) केवळ पिठासीन अधिकारी सांगली बारचे सदस्य होते व अर्जदाराचे वकील सदस्य आहेत. या एका कारणावरून त्यांना न्याय मिळणार नाही ही गोष्ट न्याय संस्थेवर संशय होणारी आहे.

७) सबब वरील कारणांचा विचार करून प्रकरण वर्ग करणेचा अर्ज मे.कोळेकरसो यांची बदली झाली असलेने या कारणावरून नामंजूर करणेत यावा.

येणेप्रमाणे म्हणणे असे.

मे.जा.व्हावे.

दि.०१/०४/२०२६ ........................